कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने शिस्तभंगाची कार्यवाही करणे बावत .
श्री. बल्लाळ प्रितम दिपक, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र जेऊर ता नगर

**अहमदनगर जिल्हा परिषद**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जिल्हा परिषद आदेश क्र-विसाप्र.१/अस्था-३/६००१९/९०५/२०२४**
**अहमदनगर दिनांक११/०७/२०२४**

वाचा:-१. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/३३२२/१००५/२२ दि २५/०८/२०२२
२. इकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/८६/२३ दि १८/०१/२०२३
३. इकडील चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नेमणुक आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-३ ३३२२/५११/२०२३ दिनांक २१/०४/२०२३
४. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा.४/खाचौ/ सी.आर.९०/२०२३ दि २६/०७/२०२३ प्राप्त दि ३०/१०/२०२३
५. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३३२२/१३१/२०२४ दिनांक १८/०१/२०२४
६. श्री. बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहायक यांचेकडील खुलासा दि ९/०२/२०२४ प्राप्त दिनांक २०/०३/२०२४
७. या कार्यालयाकडील मंजुर टिपणी २७/०६/२०२४

श्री बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र जेऊर ता.नगर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा करुन कामकाज प्रलंवित ठेवून कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा न केल्याने कर्मचाऱ्यांना सोसायटीचे भरावे लागलेले अतिरिक्त व्याज, ऑडीट करावयाचे अभिलेखे गहाळ करणे व त्या बाबत कोतवाली पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदवून कामात केलेला हलगर्जीपणा, वरिष्ठाचे आदेशाची अवमानता करुन कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणे, तसेच ग्रामिण पाणी पुरवठा येथील जलजीवन मिशन अंतर्गत ई-निविदेचे कामात गैरप्रकार व हलगर्जीपणा इत्यादी गैरवर्तन केल्याने संदर्भ क्रमांक १ अन्वये श्री बल्लाळ यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंवीत करणेत आले होते.

संदर्भ क्रमांक २ अन्वये सदर प्रकरणी श्री बल्लाळ यांना दोषारोपपत्र बजावणेत येऊन खुलासा सादर करणेवावत कळविणेत आलेले होते. संदर्भ क्र.३ चे खुलाशात श्री. बल्लाळ यांनी त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप स्पष्ट मान्य केलेले नव्हते. त्यामुळे संदर्भ क्र.४ नुसार, श्री बल्लाळ यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी तसेच सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती. संदर्भ क्र.५ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदरचे चौकशी अहवालानुसार, खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.

| आरोप क्रमांक | निष्कर्ष |
|---|---|
| आरोप क्रमांक - १ | आरोप अंशत: सिध्द होतो. |

..२

| आरोप क्रमांक | निष्कर्ष |
|---|---|
| आरोप क्रमांक - २ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्रमांक - ३ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्रमांक - ४ | आरोप सिध्द होत नाही. |

संदर्भ क्रमांक ४ नुसार प्राप्त चौकशी अहवालानुसार श्री बल्लाळ यांना संदर्भ क्रमांक ५ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस वजावुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक( नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील( नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री. बल्लाळ यांच्या दोन वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात थोपविणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या वावत खुलासा सादर करणे वावत श्री. वल्लाळ यांना कळविणेत आले.

श्री. बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, यांचेवरील गैरवर्तनाबावत दोषारोप, विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष व श्री. बल्लाळ यांनी सादर केलेला खुलासा मान्य करणेत येत येऊन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, श्री. बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, यांना सदर प्रकरणी दोषमुक्त करीत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202407111040062 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 11-07-2024 18:05:32

**(आशिष येरेकर)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

**प्रति,**

श्री. बल्लाळ प्रितम दिपक, कनिष्ठ सहाय्यक, **पंचायत समिती श्रीरामपुर.**

**द्वारा व प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर**

२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत :- निवडनस्ती.